लोकमत

# महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांजकडून

## महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६१ (१) अनुसार जाहीर सूचना

ज्याअर्थी, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ ( यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेले )चे कलम ६० ( १ ) अन्वये असलेल्या अधिकारांचा वापर करून प्राधिकरण हद्दीतील क्षेत्रापैकी नकाशात दाखविलेल्या क्षेत्रासाठी, औद्योगिक प्रयोजनार्थ प्रारुप नगर रचना योजना मौजे मोह व मौजे चिंचोली, ता. सिन्नर क्रमांक १ (यापुढे "उक्त योजना" असे उल्लेखिलेली ) तयार करावयाचा इरादा दिनांक ९ जुलै २०२४ रोजीच्या प्राधिकरण ठराव क्र.०२ अन्वये जाहीर केलेला असून, त्यासंबंधीची उद्घोषणा महाराष्ट्र शासन राजपत्र भाग -१. नाशिक विभागीय पुरवणी. दिनांक २५-३१ जुलै, २०२४ रोजी पृष्ठ क्र. २२ वर तसेच मराठी वृत्तपत्र दैनिक लोकमत मध्ये दिनांक २३ जुलै २०२४ रोजी व इंग्रजी वृत्तपत्र दैनिक टाइम्स ऑफ इंडियामध्ये दिनांक २४ जुलै २०२४ रोजी प्रसिद्ध झालेली आहे :

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४०(१घ) अन्वये नगर विकास विभागाची अधिसूचना क्रमांक टीपीएस-१११७/२१२/प्र.क्र. १०६/२०१७/नवि-९. दि.१२ जानेवारी, २०१८ नुसार नाशिक महानगर क्षेत्र "अधिसूचित क्षेत्र" म्हणून विनिर्दिष्ट करून सदर क्षेत्रासाठी नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सदर प्राधिकरणाच्या स्थापनेपासून ( दि.०१ मार्च २०१७ ) नियुक्ती करण्यात आलेली आहे :

आणि ज्याअर्थी, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी विचारविनिमय करून उक्त प्रारूप नगर रचना योजना तयार केलेली आहे व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उक्त अधिनियमातील कलम ६१( १ ) अन्वये उक्त प्रारूप नगर रचना योजना प्रसिद्धीबाबत दिनांक २१ मार्च २०२५ चे पत्रान्वये अभिप्राय कळविलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उक्त योजना तयार करण्यासाठी उक्त अधिनियमांच्या तरतुदीनुसार जे करावयास पाहिजे होते ते सर्व करून, उक्त योजना तयार केलेली आहे :

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम ६१( १ ) व त्याखालील नियमानुसार उक्त योजना दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजीच्या प्राधिकरण ठराव क्र.१ अन्वये प्राधिकरणाच्या कार्यालयामध्ये प्रसिद्ध करण्यात येत आहे;

उक्त योजनेचा नकाशा व अहवाल प्राधिकरणाच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ खुला ठेवण्यात आलेला आहे. तसेच नागरिकांना उक्त योजनेच्या नकाशाची किंवा अहवालाची प्रत किंवा त्यातील भागाची प्रत, विहित मूल्य प्राधिकरण कार्यालयात जमा केल्यानंतर, विक्रीसाठी उपलब्ध राहील.

उक्त प्रसिद्ध केलेल्या योजनेवर उक्त अधिनियमाच्या कलम ६७ ( १ ) अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० (तीस) दिवसांच्या आत, उक्त योजनेमुळे बाधा पोहचलेल्या कोणत्याही इसमाने उक्त योजनेसंबंधी कोणताही आक्षेप/सूचना (दोन प्रतीत) लेखी स्वरुपात मा. महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक यांचे नावे स.नं. ६४८/ब २. फा. प्लॉट नं. ३११पे., जैन मंदिराजवळ, राका कॉलनी, नाशिक-४२२००२ या कार्यालयात सादर करावे, म्हणजे प्राधिकरणातर्फे उक्त योजना, उक्त अधिनियमाचे कलम ६८(१) च्या तरतुदीनुसार मंजूर करण्यापूर्वी, उक्त अधिनियमाच्या कलम ६७ नुसार, योग्य त्याप्रमाणे त्यांचा विचार करण्यात येईल व आवश्यक तर उक्त योजनेत फेरफार करण्यात येईल, याची कृपया नागरिकांनी नोंद घेऊन प्राधिकरणास सहकार्य करावे.

सही/- महानगर आयुक्त
नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नाशिक

ठिकाण :- नाशिक
(शिक्का)
दिनांक :- २४.०४.२०२५